| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १२.०४.२०२३. |
| नोंदणी दिनांक | : | १२.०४.२०२३. |
| निकाल दिनांक | : | २१.०५.२०२६. |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०३ ०१ ०९ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी – श्री. बाळासाहेब श्री. गायकवाड)**

**प्रपत्र क्र.३२ भाग 'अ'**

**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i) ]**

| | | |
|---|---|---|
| MHKO180002732023 | | (जाहीर दिनांक – २१.०५.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र.२५/२०२३.**<br>CNR No. MHKO18-000273-2023.<br>**निशाणी क्र.६४.** |
| **गुन्ह्याचा तपशिल** | | पोलीस ठाणे, कुरुंदवाड गुन्हा क्र.१३/२०२३,<br>भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४. |
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे, कुरुंदवाड |
| **अभियोगपक्षातर्फे** | | **श्रीमती आ.वि.मोरे, विद्यमान विशेष सहा. सरकारी अभियोक्ता.** |
| **आरोपी** | १. | **दस्तगीर फरीद्दीन अत्तार,**<br>वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गवंडीकाम, |
| | २. | **आसिफ उर्फ शाहरुख दस्तगीर अत्तार,**<br>वय : २४ वर्षे, व्यवसाय : मजूरी, |
| | ३. | **रजिया दस्तगीर अत्तार,**<br>वय : ४० वर्षे, व्यवसाय : घरकाम ,<br>सर्व आरोपी रा. दत्तवाड,<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. |
| **आरोपींतर्फे** | | **श्री. शितल धु. पाटील, विद्यमान वकील.** |

**भाग 'ब'**
**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १६.०१.२०२३ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | १६.०१.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १२.०४.२०२३ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०१.०८.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१.११.२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २१.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

**आरोपींचा तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दस्तगीर फरीद्दीन अत्तार | - | ०१.०८.२०२३ | भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४. | निर्दोष | — | — |
| २. | आसिफ उर्फ शाहरुख दस्तगीर अत्तार | - | ०१.०८.२०२३ | | निर्दोष | — | — |
| ३. | रजिया दस्तगीर अत्तार | - | ०१.०८.२०२३ | | निर्दोष | — | — |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'क'**
**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]**
**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

अ. सरकारी

| क्र. | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सद्दाम अल्लाउद्दीन काले | तक्रारदार | ४४ |
| २. | निखील प्रभाकर मिरजे | पंच | ४७ |
| ३. | मोहन शांतिनाथ माणगावे | पंच | ४९ |
| ४. | शमशाद सद्दाम काले | साक्षीदार | ५१ |
| ५. | अल्लाउद्दीन बापू काले | साक्षीदार | ५२ |
| ६. | डॉ. वर्षा दिनेश चव्हाण | वैद्यकिय अधिकारी | ५७ |
| ७. | सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय रामचंद्र घाटगे | तपासीक अंमलदार | ५९ |

ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४५ | तक्रार |
| २. | ४८ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | ५८ | तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ४. | ६० | जप्ती पंचनामा |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १/१. | लोखंडी एक सळई. |
| २. | १/२. | दोन पेर असलेली एक काठी. |

:: **न्या य नि र्ण य** ::

(अधिघोषित दिनांक २१.०५.२०२६)

प्रस्तुत खटल्याद्वारे आरोपींची भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ या आरोपाखाली संपरिक्षा घेण्यात आली.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन :–**

०२. तक्रारदार सद्दाम अल्लाउद्दीन काले व आरोपींचे घर एकमेकांसमोर आहे. दिनांक १६.०१.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजता तक्रारदार यांचे वडील अल्लाउद्दीन हे गावात जात असतेवेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. तक्रारदार व त्यांचा भाऊ समिर यांनी आरोपींना 'शिवीगाळ करु नका,' असे सांगत असतेवेळी आरोपी क्र.२ याने दारात पडलेल्या वेताच्या काठीने तक्रारदार व समिर यांना मारहाण केली. घटनेवेळी तक्रारदार यांची पत्नी शमशाद ह्या घटनास्थळी आल्या असता, आरोपी क्र.३ हिने शमशाद यांच्या गळयातील मंगळसुत्र तोडले. तसेच, आरोपी क्र.१ याने दारात पडलेल्या लोखंडी सळईने तक्रारदार यांच्या डोक्यात मारुन त्यांना जखमी केले. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे, कुरुंदवाड येथे आरोपींविरुद्ध भारतीय दंड

संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ या आरोपाखाली गु.र.क्र.१३/२०२३ नोंदविण्यात आला व पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय रामचंद्र घाटगे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती आरोपींविरुद्ध उपरोक्त नमुद आरोपाखाली न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०३. दिनांक ०१.०८.२०२३ रोजी माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुद्ध ३२४ व ५०४ सह कलम ३४ या आरोपाखाली निशाणी क्र.१३ वर दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता आरोपींनी उक्त दोषारोप नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०४. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे :-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी घटनेवेळी आपसात संगनमत करुन तक्रारदार, तक्रारदार यांचा भाऊ, वडील व पत्नी यांना काठी व लोखंडी सळई या घातक हत्यारांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहचविली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| २. | आरोपींनी घटनेवेळी आपसात संगनमत करुन तक्रारदार, तक्रारदार यांचा भाऊ, वडील व पत्नी यांना इच्छापूर्वक शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले ज्यायोगे असे प्रक्षोभन त्यांना शांततेचा भंग करण्यास किंवा अन्य कोणताही अपराध करण्यास प्रवृत्त करणारे होते, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| ३. | आदेश काय ? | ...आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०५. आरोपींविरुद्धचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने उपरोक्त नमूद प्रपत्र क्र.३२ भाग 'क' यामध्ये नमूद करण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यानंतर, अभियोगपक्षाचा पुरावा

निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.६१ ते ६३ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी अभियोगपक्षाचा त्यांच्याविरुध्दचा संपूर्ण पुरावा नाकारला आहे.

०६. अभियोगपक्षातर्फे विद्यमान विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती आ.वि.मोरे आणि आरोपींतर्फे विद्यमान वकील श्री. शितल धु. पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

:: **कारणमिमांसा** ::

**मुद्दा क्र.१ व २ करीता** :–

०७. उपरोक्त मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे व त्यावरील अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा एकसारखा असल्यामुळे साक्षीपुराव्याचा पुनरुच्चार टाळण्याकरीता सदर मुद्दे एकत्रीतरित्या विवेचनाकरीता घेण्यात येत आहेत.

०८. तक्रारदार यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५.०१.२०२३ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या सुमारास त्यांचे वडील अल्लाउद्दीन (अ.सा.५) हे कुत्र्याला शिवी देत होते. दिनांक १६.०१.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजतातच्या सुमारास अल्लाउद्दीन (अ.सा.५) हे गावामध्ये निघाले असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी, तक्रारदार यांचा भाऊ समिर यांनी आरोपींना 'माझ्या वडीलांना शिवीगाळ करु नका,' असे म्हटले असता, आरोपींनी समिरला वेताच्या काठीने व तक्रारदार यांना सळईने मारहाण केली. घटनेवेळी सदरचे भांडण सोडविण्याकरीता तक्रारदार यांची आई आणि पत्नी शमशाद (अ.सा.४) ह्या आल्या असता, आरोपी क्र.३ हिने शमशाद (अ.सा.४) यांच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडले. घटनेनंतर तक्रारदार हे उपचाराकरीता दत्तवाड येथील शासकीय दवाखान्यामध्ये व तेथून पुढील उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल, मिरज येथे गेले होते. त्यानंतर, तक्रारदार यांनी घटनेबाबत आरोपींविरुध्द कुरुंदवाड पोलीस ठाण्यामध्ये तक्रार (निशाणी क्र.४५) दाखल केली. घटनेवेळी आरोपींनी ज्या सळईने व काठीने मारहाण

केली होती, ती सळई व काठी अनुक्रमे आर्टीकल 'अ' व आर्टीकल 'ब' वर असल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे.

०९. अल्लाउद्दीन (अ.सा.५) हे तक्रारदार यांचे वडील आहेत. अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६.०१.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास ते त्यांच्या कामावर जात होते. दिनांक १५.०१.२०२३ रोजी रात्री अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी कुत्र्याला शिवीगाळ केली असता, सदरची शिवीगाळ त्यांनी आरोपींना केल्याचे आरोपींना वाटल्यामुळे घटनेवेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी, तक्रारदार व समिर यांनी घटनास्थळी येवून आरोपींना 'शिवीगाळ करु नका, सोडा,' असे म्हटले असता, आरोपी क्र.१ याने तक्रारदार यांच्या डोक्यामध्ये लोखंडी सळईने मारहाण केली. तसेच, आरोपी क्र.२ याने समिर यांना काठीने मारहाण केली. घटनेनंतर तक्रारदार यांना दत्तवाड येथील शासकीय दवाखान्यामध्ये नेले असता, तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तक्रारदार यांना सिव्हील हॉस्पीटल, मिरज येथे नेण्यास सांगीतले. घटनेबाबत तक्रारदार यांनी आरोपींविरुध्द तक्रार दाखल केली होती. घटनेवेळी आरोपी क्र.१ व २ यांनी अनुक्रमे ज्या सळईने व काठीने मारहाण केली होती, ती सळई व काठी अनुक्रमे आर्टीकल 'ब' व आर्टीकल 'अ' वर असल्याचे अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी कथन केले आहे.

१०. शमशाद (अ.सा.४) ह्या तक्रारदार यांच्या पत्नी आहेत. शमशाद (अ.सा.४) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५.०१.२०२३ रोजी रात्री अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी कुत्र्याला शिवीगाळ केली असता, सदरची शिवीगाळ त्यांनी आरोपींना केल्याचे आरोपींना वाटल्यामुळे आरोपींनी दिनांक १६.०१.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजता अल्लाउद्दीन (अ.सा.५) हे गावामध्ये जात असतेवेळी आरोपी क्र.१ व २ यांनी अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांना शिवीगाळ केली. सदर शिवीगाळीचा आवाज ऐकून तक्रारदार व समिर घटनास्थळी गेले व त्यांनी आरोपी क्र.१ व २ यांना 'शिवीगाळ का करीत आहात,' अशी विचारणा केली. त्यावेळी, शमशाद (अ.सा.४) ह्या देखील

घटनास्थळी आवाज ऐकून गेल्या होत्या. घटनेवेळी आरोपी क्र.१ व २ यांनी तक्रारदार व समिर यांना काठीने मारहाण केली. तसेच, आरोपी क्र.१ याने तक्रारदार यांच्या डोक्यामध्ये लोखंडी सळईने मारहाण करुन त्यांना जखमी केले. त्यावेळी, आरोपी क्र.३ हिने पाठीमागून येवून शमशाद (अ.सा.४) यांच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडून त्यांचे नुकसान केले. घटनेनंतर तक्रारदार यांना दत्तवाड येथील दवाखान्यात उपचाराकरीता नेण्यात आले असता, तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तक्रारदार यांना शासकीय दवाखाना, मिरज येथे नेण्यास सांगीतले. घटनेवेळी आरोपी क्र.१ याने ज्या लोखंडी सळईने तक्रारदार यांना मारहाण केली होती, ती लोखंडी सळई आर्टीकल 'ब' वर असल्याचे शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले आहे.

११. पंच निखील (अ.सा.२) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १७.०१.२०२३ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकामी दत्तवाड शिवारातील माने नगर येथे तक्रारदार व आरोपींच्या घरांसमोर बोलाविले होते. त्यावेळी, दुसरे पंच शुभम घोरपडे, तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) व तक्रारदार हे घटनास्थळी हजर होते. घटनास्थळाच्या पूर्वेस चौगुले यांची शेती, पश्चिमेस वजीर काले यांचे राहते घर, दक्षिणेस आरोपींचे राहते घर व उत्तरेस तक्रारदार यांचे घर आहे. पोलीसांनी सदर ठिकाणचा घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) पंच निखील (अ.सा.२) यांच्यासमक्ष सकाळी ११.०० वाजता चालू करुन ११.३० वाजता संपविला.

१२. पंच मोहन (अ.सा.३) यांनी दिनांक १७.०१.२०२३ रोजी कुरुंदवाड पोलीस ठाण्यामध्ये पोलीसांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. जप्ती पंचनामा (निशाणी क्र.६०) यावरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पंच मोहन (अ.सा.३) हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतू, अभियोगपक्षास पंच मोहन (अ.सा.३) यांच्या साक्षीपुराव्यातून उपयुक्त अशी कोणतीही बाब अभिलेखावर आणता आली नाही.

१३. डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६.०३.२०१६ रोजी सकाळी ०७.१० वाजता ग्रामिण रुग्नालय, दत्तवाड येथे त्या कर्तव्यावर हजर असतेवेळी तक्रारदार यांना त्यांच्या नातेवाईकांनी उपचाराकरीता दवाखान्यात आणले होते. एका तासापूर्वी लोखंडी सळईने तक्रारदार यांना मारहाण झाल्याबाबत डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांना सांगण्यात आले होते. तक्रारदार यांची वैद्यकीय तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या डोक्यावरील समोरच्या उजव्या भागावर २.० से.मी. X ०.५ से.मी. X ०.२ से.मी. या आकाराची जखम डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांना दिसून आली. सदरची जखम साध्या स्वरुपाची आणि बोथट व जड वस्तूने सहा तासांच्या आत झालेली होती. त्यानंतर, डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांनी तक्रारदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.५८) निर्गमित केले. वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.५८) यातील नमूद जखम आर्टीकल 'अ' व आर्टीकल 'ब' वरील काठी व लोखंडी सळईने होवू शकत असल्याचे डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांनी कथन केले आहे.

१४. तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६.०१.२०२३ रोजी पोलीस ठाणे, कुरुंदवाड येथे ते कार्यरत असतेवेळी प्रस्तुत गुन्हयाचा पुढील तपास त्यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचांसह घटनास्थळी भेट देवून सदर ठिकाणचा पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) तयार केला. तसेच, सदर ठिकाणची छायाचित्रे त्यांनी काढून घेतली असून सदरची छायाचित्रे आर्टीकल 'क' व आर्टीकल 'ड' वर आहेत. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तसेच, आरोपी क्र.१ व २ यांच्या ताब्यातून अनुक्रमे लोखंडी सळई व काठी तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांनी जप्त करुन जप्ती पंचनामा (निशाणी क्र.६०) तयार केला. सदर पंचनाम्याद्वारे जप्त केलेली सळई व काठी अनुक्रमे आर्टीकल 'अ' व आर्टीकल 'ब' वर असल्याचे तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांनी कथन केली आहे.

१५. विद्यमान विशेष सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे की, अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी आरोपींविरुद्ध ठोस पुरावा दिला असून अभियोगपक्षाने सदर

साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यातून आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध केला आहे. त्यामुळे, आरोपींना कायद्याप्रमाणे कडक शिक्षा ठोठावण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

१६. याउलट, आरोपींचे विद्यमान वकील यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केले आहे की, तथाकथीत घटनेच्या महत्वपूर्ण बाबींसंदर्भातील अभियोगपक्षाच्या प्रमुख साक्षीदारांचा साक्षीपुरावा एकमेकांशी कमालीचा विसंगत आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने कोणत्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा एकूण साक्षीपुरावा साधारण, औपचारिक व मोघम असून सदर साक्षीदारांनी आरोपींविरुद्ध कोणताही ठोस तथा सबळ पुरावा दिला नाही. पंच मोहन (अ.सा.३) यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसून सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न करण्यामागचे कोणतेही ठोस कारण अभियोगपक्षाने अभिलेखावर मांडले नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाच्या एकूण कथनाबाबत साशंकता निर्माण होत आहे. सबब, अभियोगपक्षास आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे सिद्ध करता आला नाही. त्यामुळे, आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी, असा युक्तिवाद आरोपींचे विद्यमान वकील यांनी केला आहे.

१७. तक्रारदार, शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्याचे एकत्रीत अवलोकन केले असता असे दिसून येत की, तथाकथीत घटनेवेळी आरोपींनी अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांना शिवीगाळ केल्यामुळे त्याबाबत आरोपींकडे जाब विचारला असता तथाकथीत घटना घडल्याचे सदर तीनही साक्षीदारांनी कथन केले असले तरी, तथाकथीत घटनेवेळी आरोपींनी अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांना नेमकी काय शिवीगाळ केली, याबाबत सदर तीनही साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. महत्वाचे म्हणजे, तथाकथीत घटनेवेळी केवळ समिर यांनी आरोपींना 'माझ्या वडीलांना शिवीगाळ करु नका,' असे म्हटल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. याउलट, तथाकथीत घटनेवेळी तक्रारदार व समिर यांनी आरोपी क्र.१ व २ यांना 'शिवीगाळ का करीत आहात,' अशी विचारणा केल्याचे शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले आहे. तसेच, तक्रारदार व समिर यांनी आरोपींना 'शिवीगाळ करु

नका, सोडा,' असे म्हटल्याचे अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी कथन केले आहे. तथाकथीत घटनेवेळी आरोपी क्र.१ याने तक्रारदार यांच्या डोक्यामध्ये लोखंडी सळईने मारहाण केल्याचे शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनाबाबत तक्रारदार यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. घटनेवेळी आवाज ऐकून घटनास्थळी आल्याबाबत शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनाबाबत तक्रारदार व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. घटनेवेळी आरोपी क्र.१ व २ यांनी तक्रारदार यांना काठीने मारहाण केल्याबाबत शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनाबाबत तक्रारदार व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. तथाकथीत घटनेवेळी आरोपी क्र.३ हिने शमशाद (अ.सा.४) यांच्या गळयातील मंगळसूत्र तोडल्याबाबत तक्रारदार व शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनाबाबत अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. घटनेवेळी भांडण सोडविण्याकरीता तक्रारदार यांची आई व शमशाद (अ.सा.४) ह्या आल्याबाबत तक्रारदार यांनी कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनाबाबत शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता, तथाकथीत घटनेच्या महत्वपूर्ण बाबींसंदर्भातील तक्रारदार, शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांचा साक्षीपुरावा एकमेकांशी कमालीचा विसंगत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, तक्रारदार, शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटी व विसंगतींमुळे सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

१८. तथाकथीत घटनेवेळी आरोपींनी समिरला वेताच्या काठीने व तक्रारदार यांना सळईने मारहाण केल्याची बाब तक्रार (निशाणी क्र.४५) दाखल करतेवेळी व जबाब देतेवेळी पोलीसांना सांगीतल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. परंतू, सदरची बाब तक्रार (निशाणी क्र.४५) व

जबाबामध्ये पोलीसांनी का नमूद केली नाही, याचे कारण सांगता येत नसल्याचे तक्रारदार यांनी कथन केले आहे. तथाकथीत घटनेवेळी आरोपी क्र.१ व २ यांनी तक्रारदार व समिर यांना काठीने मारहाण केल्याची बाब जबाब देतेवेळी पोलीसांना सांगीतल्याचे शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले आहे. परंतू, सदरची बाब पोलीसांनी जबाबामध्ये का नमूद केली नाही, याचे कारण सांगता येत नसल्याचे शमशाद (अ.सा.४) यांनी कथन केले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, तक्रारदार व शमशाद (अ.सा.४) यांनी उपरोक्त नमूद बाबींसंदर्भात न्यायालयासमक्ष पहिल्यांदाच भाष्य केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, उपरोक्त नमूद बाबींसंदर्भातील तक्रारदार व शमशाद (अ.सा.४) यांचा साक्षीपुरावा विश्वासार्ह ठरत नाही.

१९. तक्रारदार, शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटी व विसंगतींमुळे आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने घटनास्थळाच्या आजुबाजूच्या स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविणे आवश्यक होते. तथाकथीत घटना अंदाजे अर्धा तास चालल्याचे आणि घटनेवेळी घटनास्थळी बरेच लोक जमा झाल्याचे तक्रारदार, शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) यांनी कथन केले आहे. त्यामुळे, आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने तथाकथीत घटनेवेळी घटनास्थळी जमलेल्या स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविणे आवश्यक होते. परंतू, तपासादरम्यान तथाकथीत घटनेबाबत स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडे चौकशी केली नसल्याचे व त्यांचे जबाब नोंदविले नसल्याचे तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांनी कथन केले आहे. त्यामुळे, अभियोगपक्षास तथाकथीत घटना व आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे सिध्द करण्याकरीता स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविता आली नाही. सबब, अभियोगपक्षाच्या एकूण कथनाबाबत साशंकता निर्माण होत आहे.

२०. पंच निखील (अ.सा.२) यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या तथाकथीत घटनास्थळाच्या चतु:सिमा घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) यामध्ये का नमूद केलेल्या नाहीत, याचे कारण सांगता येत नसल्याचे कथन केले आहे. सबब, पंच निखील (अ.सा.२) यांना घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) यामध्ये नमूद केलेल्या घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगता आल्या नसल्याचे दिसून येत आहे. तसेच, तथाकथीत घटनास्थळाचे सविस्तर वर्णन, याबाबत पंच निखील (अ.सा.२) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केला नाही. तसेच, तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) तयार केल्याचे कथन केले असले तरी, तथाकथीत घटनास्थळाचे सविस्तर वर्णन तथा चतु:सिमा, याबाबत त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. तसेच, घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) कोणत्या दिवशी आणि किती वाजता सुरु करुन किती वाजता संपविण्यात आला, याबाबत देखील त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने दुसरे पंच शुभम घोरपडे यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. सबब, पंच निखील (अ.सा.२) व तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटींमुळे आणि पंच शुभम यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.४८) संशयापलिकडे सिध्द करता आला नाही.

२१. पंच मोहन (अ.सा.३) यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसून सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य न करण्यामागचे कोणतेही ठोस तथा सबळ कारण अभियोगपक्षाने अभिलेखावर मांडले नाही. तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांनी जप्ती पंचनामा (निशाणी क्र.६०) अन्वये आरोपी क्र.१ याच्या ताब्यातून लोखंडी सळई व आरोपी क्र.२ याच्या ताब्यातून एक काठी जप्त केल्याचे कथन केले असले तरी, तथाकथीत लोखंडी सळई व काठी यांचे सविस्तर वर्णन तथा विवरण, याबाबत त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. तसेच, जप्ती पंचनामा (निशाणी क्र.६०) कोणत्या दिवशी आणि किती वाजता सुरु करुन किती वाजता संपविण्यात आला,

याबाबत देखील त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये काहीही भाष्य केले नाही. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने जप्ती पंचनामा (निशाणी क्र.६०) यावरील दुसरे पंच विशाल शिंदे यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. सबब, पंच मोहन (अ.सा.३) यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटींमुळे व पंच विशाल यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास जप्ती पंचनामा (निशाणी क्र.६०) संशयापलिकडे सिध्द करता आला नाही.

२२. अभियोगपक्षाचे कथन, वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.५८) व तक्रारदार यांचा साक्षीपुरावा यानुसार, डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांनी तक्रारदार यांची वैद्यकीय तपासणी दिनांक १६.०१.२०२३ रोजी केली होती. याउलट, डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांनी तक्रारदार यांची वैद्यकीय तपासणी दिनांक १६.०३.२०२३ रोजी केल्याचे कथन केले आहे. सबब, तक्रारदार यांच्या वैद्यकीय तपासणीच्या महिन्याविषयीचा डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांचा साक्षीपुरावा अभियोगपक्षाचे कथन, वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.५८) व तक्रारदार यांचा साक्षीपुरावा यांच्याशी कमालीचा विसंगत असल्याचे दिसून येत आहे. डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांनी तक्रारदार यांची वैद्यकीय तपासणी केली असता, तक्रारदार यांच्या डोक्यावरील समोरच्या उजव्या भागावर २.० से.मी. X ०.५ से.मी. X ०.२ से.मी. या आकाराची जखम दिसून आल्याचे कथन केले असले तरी, सदर महत्वपूर्ण कथनास तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्यातून पुष्टी मिळत नसल्याचे दिसून येत आहे. सबब, डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांच्या साक्षीपुराव्यातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटी व विसंगतींमुळे अभियोगपक्षास वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र.५८) संशयापलिकडे सिध्द करता आले नाही.

२३. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या एकूण साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, तक्रारदार, पंच निखील (अ.सा.२), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५), डॉ. चव्हाण (अ.सा.६) व तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांचा साक्षीपुरावा औपचारीक, साधारण व मोघम

असून सदर साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीपुराव्यातून आरोपींविरुध्द कोणताही ठोस तथा सबळ पुरावा दिला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, अभियोगपक्षाच्या एकूण साक्षीपुराव्याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

२४. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, तक्रारदार, पंच निखील (अ.सा.२), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शमशाद (अ.सा.४) व अल्लाउद्दीन (अ.सा.५) आणि डॉ. चव्हाण (अ.सा.६) यांच्या साक्षीपुराव्यातील तसेच, तपासीक अंमलदार घाटगे (अ.सा.७) यांच्या साक्षीपुराव्यातील व तपासातील उपरोक्त नमूद महत्वपूर्ण त्रुटींमुळे आणि पंच मोहन (अ.सा.३) यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे व स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष तसेच सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. सबब, अभियोगपक्षास आरोपींविरुद्ध ठेवण्यात आलेल्या अपराधांची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. त्यामुळे, मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.३ करीता</u> :-

२५. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपींविरुद्ध कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपींना संशयाचा फायदा देऊन सदर आरोपींची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.३ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

१. आरोपी क्र.१ दस्तगीर फरीद्दीन अत्तार, आरोपी क्र.२ आसिफ उर्फ शाहरुख दस्तगीर अत्तार आणि आरोपी क्र.३ रजिया दस्तगीर अत्तार यांची भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कद्बे रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमालातील एक लोखंडी सळई व एक काठी हे मुल्यहिन व निरुपयोगी असल्यामुळे सदर मुद्देमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– किंमतीचे वैयक्तीक व तितक्याच रकमेचे प्रत्येकी एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.05.21 17:27:56 +0530

दिनांक : २१.०५.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.